सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड इमारत, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४.
Email Id: contact-secretary@mpsc.gov.in Website: https://mpsc.gov.in, https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc ०२२-६१३८५१००

क्रमांक:सीबीटी-०६२२/प्र.क्र.३३/२०२६/ ३१ दिनांक: २७ जुलै, २०२६

**-: प्रसिध्दीपत्रक :-**

**विषय :-** दिव्यांग व्यक्तींना परीक्षेच्यावेळी सहायक व इतर सोयी-सवलती उपलब्ध करुन देणेबाबत.

**संदर्भ :-** (१)शासन परिपत्रक, दिव्यांग कल्याण विभाग, क्रमांक दिव्यांग २०१९/ प्र.क्र.२००/दि.क.२, दिनांक १ ऑगस्ट,२०२५

(२)आयोगाचे प्रसिद्धीपत्रक क्रमांक सीबीटी-०६२२/प्र.क्र.२४/२०२६/३१, दिनांक २६ जुलै, २०२६

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित परीक्षांच्यावेळी दिव्यांग उमेदवार संगणक प्रणालीवर आधारित परीक्षा देण्यास सक्षम नसल्यास त्यांच्या मागणीप्रमाणे सहायक तसेच अन्य सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने आयोगाच्या संकेतस्थळावर 'दिव्यांग उमेदवारांकरीता मार्गदर्शक सूचना' प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार आयोगामार्फत प्रसिध्द करण्यात येणाऱ्या जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर केल्यानंतर संबंधित दिव्यांग उमेदवारांनी सहायकाची मदत घेण्याची आणि भरपाई वेळेची आवश्यकता असल्यास आयोगाकडे संबंधित सर्व कागदपत्रांसह संदर्भित शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार विनंती अर्ज (प्रपत्र १ अथवा प्रपत्र २ व नमूना क्रमांक ११ ), कायमस्वरुपी किमान ४०% दिव्यांगत्व असल्याचे प्रमाणपत्र आणि लेखनिकाचे आधार कार्ड सादर करुन पूर्व परवानगी घेणे अनिवार्य आहे. केवळ भरपाई वेळेची आवश्यकता असल्यास शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार विनंती अर्ज (प्रपत्र १ अथवा प्रपत्र २ व नमूना क्रमांक ११) व कायमस्वरुपी किमान ४०% दिव्यांगत्व असल्याचे प्रमाणपत्र सादर करुन पूर्व परवानगी घेणे अनिवार्य आहे.

**२.**आयोगामार्फत प्रसिध्द करण्यात आलेल्या खालील जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर केलेल्या व सहायकाची मदत घेण्याची आणि/अथवा भरपाई वेळेची आवश्यकता असलेल्या दिव्यांग उमेदवारांनी विहित नमुन्यातील विनंती अर्ज संबंधित सर्व कागदपत्रांसह केवळ **so-vpr@mpsc.gov.in** या ईमेल आयडीवर पाठविणे आवश्यक आहे:

| **अ.क्र.** | **जाहिरात क्रमांक** | **संवर्ग** | **परीक्षा ठिकाण** | **परीक्षा दिनांक** | **विनंती अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक** |
|---|---|---|---|---|---|
| १ | ४८/२०२३ | सहायक प्राध्यापक (गणित), महाराष्ट्र अभियांत्रिकी शिक्षक सेवा, गट-अ | मुंबई, पुणे, नागपूर | २५ ऑगस्ट, २०२६ | **०७ ऑगस्ट ,२०२६** |

**३. उपरोक्त नमूद विहित वेळेत व प्राधिकृत ई-मेल आयडीवर पूर्व परवानगीसाठी विहित पध्दतीने अर्ज सादर न केल्यास सहायक आणि/अथवा भरपाई वेळेची सवलत देय राहणार नाही.**

**४. ज्या उमेदवारांनी जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर करताना सहायक आणि/ अथवा भरपाई वेळेची आवश्यकता असल्याचे अर्जात नमूद केले नाही / दावा केला नाही अशा उमेदवारांच्या मागणीचा सहायक आणि/ अथवा भरपाई वेळीची सवलत देण्याकरीता विचार करण्यात येणार नाही, याची उमरांनी कृपया नोंद घ्यावी.**

**५.सहायकाची मागणी करणाऱ्या दिव्यांग उमेदवारांचे लक्ष संदर्भिय शासन परिपत्रकातील परिच्छेद क्र. ७ मधील "लेखनिक/ वाचक/ प्रयोगशाळा सहाय्यक यांची शैक्षणिक पात्रता सदर परीक्षेकरिता असलेल्या किमान शैक्षणिक पात्रतेपेक्षा कमी असावी आणि उमेदवाराच्या शैक्षणिक पात्रतेपेक्षा एका टप्प्याने कमी असावी" या तरतुदीकडे विशेषत्वाने वेधण्यात येत आहे.**

६.दिव्यांग उमेदवारांनी सहायकाची आणि/अथवा भरपाई वेळेची सवलत घेतल्यास परीक्षेच्या वेळी आयोगाच्या संकेतस्थळावर 'दिव्यांग उमेदवारांकरीता मार्गदर्शक सूचना' मध्ये नमूद केलेल्या व उमेदवाराला लागू असलेला नमूना क्रमांक ९, १०, ११ व १२ भरून देणे आवश्यक आहे.

७. अंधत्व / शारीरिक दिव्यांगत्व (दोन्ही हात बाधित असलेले / दोन्ही हात नसलेले) / मेंदुचा पक्षाघात असलेल्या उमेदवारांनी नमुना क्रमांक ११ सादर करणे आवश्यक नाही.

८. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ मधील कलम २ (आर) मधील व्याख्येनुसार लक्षणीय (Benchmark) दिव्यांगत्व असलेल्या तसेच कलम २ (एस) मधील व्याख्येनुसार दिव्यांगत्व असलेल्या ज्या व्यक्तींना लिखाण करताना अडचणी / मर्यादा येतात, त्याचप्रमाणे ज्यांची लेखनाची गती कमी असते अशा दिव्यांग व्यक्तींची इच्छा असल्यास त्यांना लेखनिक / वाचक / प्रयोगशाळा सहाय्यक यांची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल.

९. संदर्भिय शासन परिपत्रकातील परिच्छेद क्र. १३ मधील तरतुदीनुसार आयोगाकडून उमेदवारांना संगणक प्रणालीवर आधारित परीक्षा पध्दती व स्वरुप अवगत व्हावे याकरीता आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील 'ONLINE FACILITIES' या मेनूमध्ये 'Computer Based Examinations > Mock Test' येथे एक वेबलिंक उपलब्ध करून देण्यात आली आहे, त्यावर दिव्यांग उमेदवारांनी सराव करून संगणक प्रणालीची हाताळणी करावी.

**१०. केवळ संबंधित जाहिरातीस अनुसरुन ऑनलाईन अर्ज सादर करताना सहायक आणि/अथवा भरपाई वेळेकरिता दावा केला म्हणून उमेदवारांना सहायक आणि/अथवा भरपाई वेळेची सवलत देय असणार नाही. ऑनलाईन अर्जाद्वारे दावा करुन उमेदवारांनी विहित पध्दतीने आयोगाकडून स्वतंत्र पूर्व परवानगी घेतली असल्यासच सहायक आणि / अथवा भरपाई वेळेची सवलत देय राहील.**

**११. दिव्यांग उमेदवारांनी प्रपत्र १ मध्ये विनंती केलेल्या अर्जानुसार पात्र लेखनिकाचा तपशिल तपासून आयोगाद्वारे मान्यता दिल्यानंतर तोच लेखनिक परीक्षेकरीता ग्राह्य असेल. उमेदवारांनी प्रपत्र १ मध्ये नमुद लेखनिकच सोबत आणणे बंधनकारक आहे. अन्य व्यक्तींना ऐनवेळी लेखनिक म्हणून मान्यता देण्याची उमेदवारांची विनंती ग्राह्य धरण्यात येणार नाही.**

**१२. प्रस्तुत परीक्षेचे आयोजन ऑनलाईन पदधतीने करण्यात येणार असल्याने केवळ so-vpr@mpsc.gov.in या ई-मेलवर दिनांक ०७ ऑगस्ट ,२०२६ पर्यंत सादर केलेल्या विनंती अर्जाच्या अनुषंगाने सहायक आणि/ अथवा भरपाई वेळ देण्याची कार्यवाही आयोगाद्वारे करण्यात येईल. दिनांक ०७ ऑगस्ट ,२०२६ नंतर आयोगास प्राप्त झालेल्या अर्जांच्या अनुषंगाने सहायक आणि/अथवा भरपाई वेळ देण्याची कार्यवाही करण्यात येणार नाही याची संबंधित दिव्यांग उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

**१३.** विहित प्रपत्र १, प्रपत्र २, नमुना क्रमांक ९, १०, ११ व १२ आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**१४.** प्रस्तुत प्रकरणी उमेदवारांनी शंका/समाधानासाठी ०२२-६९३८५९७५ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

ठिकाण : नवी मुंबई

( सरिता बांदेकर देशमुख )
सहसचिव,
दक्षता, धोरण व संशोधन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग